**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२२५/२०२५</u>**
**<u>मैनोद्दीन व ईतर वि. मुद्रीकाबाई</u>**

–:: **<u>नि.क्र.१५ लगत आदेश</u>** ::–

वादीचे अधिवक्ता श्री. जाधव यांनी जोरदार युक्तिवाद केला आणि महसूल अधिकारी हे दि.०५/०३/२०२६ रोजी बांधावरील रस्ता खुला करण्यासाठी जाणार असल्याने प्रतिवादींनी जैसे थे ची परिस्थिती ठेवण्यासाठी विनंती केली. मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. वादीने दाव्यामध्ये तहसीलदारांच्या रस्ता मंजुरीच्या आदेशाबाबत नमूद केलेले आहे. परंतु वादीने सदर आदेशाला दाव्यामध्ये स्पष्टपणे आवाहन देऊन त्याविरुध्द अनुतोष मागितलेला नाही. वादीने केवळ कायम मनाईहुकूम मिळविण्याकरिता दावा केलेला आहे. त्याचप्रमाणे वादीने अर्ज नि.५ मध्ये सुध्दा सदर आदेशाविरुध्द मागणी केलेली नाही. वादीने यादी नि.१३ सोबत मंडळ अधिकारी वलांडी यांनी रस्ता खुला करण्यासाठी दिलेली नोटीस दाखल केली. यथास्थितीत, मंडळ अधिकारी किंवा महसूल अधिकारी हे दि.०५/०३/२०२६ रोजी रस्ता खुला करण्यासाठी जाणार आहे. त्यामुळे याक्षणी प्रतिवादी हे जनावरे किंवा वाहनांच्या सहाय्याने वाद मिळकतीमधील पिकाचे नुकसान करतील हे ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे याक्षणी जैसे थे चा आदेश मंजूर करणे अनुचित ठरेल. सबब अर्ज पुढील तारखेवर प्रतिवादींच्या म्हणण्याकरिता आणि युक्तिवादाकरिता नेमण्यात येते.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.04 17:41:19 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – ०४–०३–२०२६**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**